# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## फेब्रुवारी २०२६

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२८४६/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

फेब्रुवारी २०२६



## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये फुले कृषि महोत्सव उत्साहात संपन्न








**दि. १८ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये कृषि विद्यापीठ, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उमेद अभियान, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाबीज, नाबार्ड, पाणी फाऊंडेशन आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरात ''फुले कृषि तंत्रज्ञान घरो घरी, समृद्धी येईल गावो गावी'' या उपक्रमांतर्गत ''फुले कृषि महोत्सव–२०२६''–थेट पीक प्रात्यक्षिके, शिवार फेरी व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी सहकार मंत्री श्री. सुभाष देशमुख, कृषि परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. तुषार पवार, माजी आमदार श्री. प्राजक्त तनपुरे, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. इंद्र मणी, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, कृषि परिषदेच्या महासंचालीका श्रीमती वर्षा लड्डा–उंटवाल, कार्यकारी परिषद सदस्य दत्तात्रय उगले, डॉ. शिल्पा पाटील, पुणे येथील विभागीय कृषि संहसंचालक दत्तात्रय गवसाने, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष श्री. कैलास भोसले, श्री. अण्णासाहेब बाचकर, श्री. बाळासाहेब जठार व श्री. बाळासाहेब आढाव उपस्थित होते.

यावेळी मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे काम चांगले आहे. राहुरी कृषि विद्यापीठाचे काम हे दीपस्तंभासारखे आहे. अजूनही आपल्याला खोलवर जाऊन काम करण्याची गरज आहे. शेतीच्या कामांमध्ये महिला भगिनी अग्रेसर आहेत. या महिलांचे शेतीमधील श्रम कमी करण्यासाठी संशोधन होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची प्रगती ही कृषि विद्यापीठांनी विकसीत केलेल्या वाणांमुळेच आहे. कृषि विभागांतर्गत आपण ५० हून अधिक शेतकरीभिमुख योजना राबवत आहोत. शेतकऱ्यांची काळजी घेणे व त्यांचे हित जपणे हे आमचे कर्तव्य आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सवलती कशा देता येतील यावर आम्ही भर देत आहोत. साडेसात हॉर्सपॉवरपर्यंतच्या मोटारीचे बिल आपण माफ केलेले आहे. यासाठी शासनाने ३१ हजार कोटी रुपये निधी दिला आहे. कृषिच्या योजना व कृषि

विद्यापीठाचे तंत्रज्ञान हे शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. यासाठी कृषिमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आपण सुरू केलेला आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा आम्हाला माहिती आहेत. पेरणीपासून ते विपणनापर्यंत शेतकऱ्यांना प्रत्येक टप्प्यावर मदत कशी करता येईल यावर आम्ही भर देत आहोत. कै. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे काम करणारे नेते होते. शब्दाला जागणारे नेते होते. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करत आहोत. विद्यार्थ्यांना उद्देशुन ते म्हणाले की विद्यार्थ्यांकडून त्यांच्या घरच्यांच्या फार अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. भरपूर कष्ट करावे व आपले आयुष्य घडवावे. आयुष्य फार सुंदर आहे या सकारात्मक विचाराने आपली प्रगती होईल. कृषि पदवीधरांमध्ये फार एकी आहे. हे कृषि पदवीधर त्यांच्या मित्रांच्या सुखदुःखांमध्ये कायम सहभागी असतात. कृषि पदवीधरांसारखी एकी मी कोणत्याच शाखेमध्ये बघितलेली नाही. मी स्वतः सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातला असून शेतीची कामे करत लहानाचा मोठा झालो. आज अनेक व्यवसाय असले तरी शेतीसारखा आनंद इतर कोणत्याही व्यवसायात नाही.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की विद्यापीठाची पुढील वाटचाल शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून करणार आहोत. शेतीवर परिणाम करणाऱ्या हवामान बदलावर मात करण्यासाठी डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर विद्यापीठाचा भर राहणार आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विद्यापीठाच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचे दालन सुरु करणार आहोत. फुले कृषि महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या विविध प्रकल्पांवर आयोजीत पीक प्रात्यक्षिकांना शेतकऱ्यांनी भेटी देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कृषिदर्शनी–२०२६ व मफुकृवि कॅलेंडर–२०२६ या प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले तसेच फुले कृषि वाहिनी ९०.८ एफ.एम. युट्युब चॅनल, मफुकृवि युट्युब चॅनल, फुले अमृतकाळ व फुले डेअरी ॲपचे लोकार्पण करण्यात आले. सौ. सविता नालकर व सौ. स्वाती शिंगाडे या प्रगतशील महिला शेतकऱ्यांचा त्यांनी कृषि क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्तीपत्रक देवून आंतरराष्ट्रीय महीला शेतकरी वर्षाचे औचित्य साधून कृषि मंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय समन्वीत फळ संशोधन योजनेला उत्कृष्ठ संशोधन प्रकल्पाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील व योजनेच्या प्रमुख डॉ. सुमती दिघे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचा आराखडा तयार करणारे आर्किटेक्ट श्री. रोहन मांडे यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृषि मंत्र्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले. कृषि प्रदर्शनाचे उद्घाटन देखील कृषि मंत्री मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे विविध तंत्रज्ञान व उत्पादने दर्शविणारे स्टॉल्स, महाबीज आणि कृषि विभागाचे स्टॉल्सला मान्यवरांनी भेटी दिल्या. प्रदर्शनाच्या दरम्यान कृषि मंत्र्यांनी कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यानंतर त्यांनी भाजीपाला प्रकल्पाच्या थेट पीक प्रात्यक्षिकांना भेट दिली. उमेद अभियान अंतर्गत बचतगटांच्या स्टॉल्सला शेतकरी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भाजीपाला सुधार प्रकल्प, कडधान्य सुधार प्रकल्प व ज्वारी सुधार प्रकल्प येथील थेट पीक प्रात्यक्षिकांना शेतकऱ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात पाच प्रकल्पग्रस्तांना नोकरीचे आदेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. प्रशांत बोडके यांनी मानले. याप्रसंगी कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने, सुरसिंग पवार, प्रभारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. सागर गायकवाड, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. दत्तात्रय डमाळे, श्री. प्रविण गोसावी, श्री. अक्षय गोसावी, श्री. नंदु वाणे, तालुका कृषि अधिकारी श्री. बापुसाहेब शिंदे, यावेळी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १० जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), प्राध्यापक, विविध प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी, कर्मचारी, विद्यार्थी व ६ हजारपेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ए.आय. फॉर ॲग्री या जागतिक परिषदेमध्ये सन्मान

**दि. २३ फेब्रुवारी, २०२६.** मुंबईत सुरु असलेल्या ए.आय. फॉर ॲग्री आणि गुंतवणुकदार जागतिक परिषद–२०२६ या परिषदेत मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रोग आणि किडींची ओळख या कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत ॲपचे अनावरण करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली या ए.आय. ॲपसाठी माहिती तयार करण्यात आली होती. विद्यापीठाच्या या योगदानाबद्दल यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पोकरा, कृषि विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब, आय.आय.टी., मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या ॲपची निर्मिती करण्यात आली असून कृषि विभागाचे लोकप्रिय महाविस्तार मोबाईल ॲपमध्ये या रोग आणि

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी




किडींची ओळख या ॲपचा अंतर्भाव करण्यात आला आहे. यामुळे विविध पिकांवरील रोग आणि किडी यांचे फोटोवरुन शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांवरील रोग व किडींचे निदान करुन त्यांच्या नियंत्रणाकरीता उपाययोजना त्वरीत सुचवल्या जातील. या ॲपमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांवरील रोग आणि किडींचे वेळेवर अचूक निदान व त्यावरील उपाय यामुळे त्यांचा औषधांवरील खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. सध्या या ॲपमध्ये १८ पिकांचे विविध ६९ रोग आणि ३५ किडींची पूर्ण माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. या ॲपमध्ये राज्यातील उर्वरीत पिकांवरील किडी आणि रोगांची माहिती लवकरच समाविष्ट करण्यात येणार आहे. या ॲपमध्ये योगदान दिल्याबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी किड व रोग शास्त्रज्ञ, कृषि अभियांत्रिकी आणि इतर संबंधीत प्राध्यापक ज्यांनी या ॲपसाठी योगदान दिले आहे त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे शुभहस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन संपन्न



**दि. २६ फेब्रुवारी, २०२६.** मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे प्रस्तावीत असलेल्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राची नवीन प्रशासकीय इमारत, शेतकरी प्रशिक्षण इमारत तथा अतिथीगृह आणि कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद डोके, संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की पाडेगाव ऊस संशोधन केंद्र सन २०३२ मध्ये शताब्दी वर्ष पूर्ण करणार आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राच्या आतापर्यंतच्या गौरवशाली संशोधन कार्याची शासन स्तरावर नोंद घेवून सदरचे संशोधन केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रयोगशाळा तसेच प्रक्षेत्रावर विविध सुविधा, केंद्रावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कर्मचारी निवासस्थान तसेच केंद्राला भेट देण्यासाठी येणाऱ्या कृषि अधिकारी, ऊस कारखान्यांचे अधिकारी व शेतकरी

यांची राहण्याची व्यवस्था, प्रशिक्षण केंद्रासाठी भरीव निधी शासनाने उपलब्ध करून दिला. मागील ९३ वर्षापासून या संशोधन केंद्राने अधिक उत्पन्न आणि साखर उतारा देणारे १७ सुधारीत वाण प्रसारीत केलेले असून अर्थिकदृष्टया किफायतशीर ऊस लागवड तंत्रज्ञानासंबंधी ११० शिफारशी दिल्या आहेत. राज्यात ऊस लागवडीखालील असलेल्या एकूण ७५ टक्के क्षेत्रावर या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या फुले २६५ आणि को ८६०३२ या दोन वाणांखाली क्षेत्र असून त्यामधून राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रू.१,००,७८७ कोटीचा निव्वळ नफा मिळालेला आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील ऊस शेती व त्यावर आधारीत साखर उद्योग यांच्या भरभराटीत या संशोधन केंद्राने मोठे योगदान दिले आहे.

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे, माजी कृषिमंत्री मा. ॲड. माणिकराव कोकाटे यांचे सहकार्याने हा निधी उपलब्ध झाला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे व पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष श्री. तुषार पवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, कृषिच्या उपसचिव श्रीमती प्रतिभा पाटील यांचे सहकार्य आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, माजी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन





**दि. १२ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठस्तरीय सन २०२५-२६ च्या कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजु अमोलिक, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभागाचे प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की खेळामुळे आपले स्वास्थ्य चांगले राहते, आरोग्य सुदृढ होते, सांघीक भावना वृध्दींगत होऊन आत्मविश्वास वाढतो. यामुळे पुढील आयुष्याची वाटचाल ही प्रगतीची होते. खेळामध्ये विजय पराभव हा होतच असतो. पराभव ही यशाची पहिली पायरी समजावी व पुढील वर्षासाठी जय्यत तयारी करावी. या स्पर्धेच्या युगामध्ये शैक्षणीक योगदान महत्वाचे आहे. यासाठी आरोग्य सुदृढ राहणे गरजेचे असल्याने हे विविध क्रीडा स्पर्धेतून साधता येते. या सर्वाचा परिपाक म्हणुन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की क्रीडा स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे खिलाडूवृत्ती वाढते, शरीर तंदुरुस्त होते आणि आयुष्याला शिस्त लागते. आयुष्यामध्ये एकतरी क्रीडा प्रकारात नैपुण्य असणे गरजेचे आहे. स्पर्धेमध्ये हारजीत महत्वाची नसुन सहभाग महत्वाचा आहे. यावेळी डॉ. प्रशांत बोडके यांनी खेळाडूंना खेळतांना संघभावना व मित्रभावना जोपासावी असे आवाहन केले. यावेळी प्रस्ताविक करतांना डॉ. विजु अमोलिक म्हणाले की कृषि तंत्रज्ञान शिक्षणाच्या अंतर्गत ८२ कृषि तंत्र विद्यालये असून या विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये १० संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेमध्ये एकुण ४९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. या क्रीडा स्पर्धेमध्ये खो-खो, व्हॉलीबॉल, कब्बडी, लांब उडी, उंच उडी इ. मैदानी स्पर्धांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील खेळाडू यश काळाणे याने सर्व खेळाडूंना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप गायकवाड यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील

विभाग प्रमुख, अधिकारी, घटक विद्यालयांचे प्राचार्य, संघ प्रमुख व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. या क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यामध्ये श्री. अशोक हारदे, श्री. दत्तात्रय राजे, श्री. हेमचंद्र परदेशी, श्री. भाऊसाहेब बेल्हेकर यांनी परिश्रम घेतले.

## केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे केळी दिवस व शिवारफेरी कार्यक्रम उत्साहात संपन्न







**दि. ४ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे फुले कृषि महोत्सव–२०२६ अंतर्गत केळी दिवस व शिवारफेरी या कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे, नंदुरबार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. ए.बी. होले, मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड जळगावचे डॉ. के. बी. पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जळगाव श्री. कुरबान तडवी, केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अरुण भोसले, जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दीपक दहाट व जळगाव कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. हेमंत बाहेती उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की केळी पिकामध्ये सुधारित लागवड पद्धतींच्या वापराबरोबर रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन केल्यास तसेच उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यास उत्पन्नात निश्चितच वाढ होईल. नवीन संशोधन निष्कर्षांवर आधारित प्रयोगांची आखणी यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने केळी उत्पादनात व उत्पनात वाढ होईल. डॉ. गोरक्ष ससाणे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तांत्रिक चर्चासत्रामध्ये कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम यांनी नियंत्रित केळी उत्पादनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व ड्रोन वापर याविषयीचे प्रगत तंत्रज्ञान, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड यांनी केळी प्रक्रिया व उत्पादन, डॉ. के. बी. पाटील यांनी नियंत्रित केळी लागवडीतील आढळणारे अडथळे व उपाय, जळगावचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी यांनी जळगाव जिल्ह्यातील केळी पिकाची सद्यस्थिती व नियंत्रित आकडेवारी व कृषिविद्यावेता डॉ. उल्हास सुर्वे यांनी केळीसाठी जमीन आरोग्य व्यवस्थापन या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी केळी शेतकरी

शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. संदीप पाटील व उपाध्यक्ष श्री. विनोद बोरसे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आधुनिक केळी लागवड, संशोधन पुस्तिका, केळीवरील करपा, पनामा व कुकुंबर मोजॅक व्हायरस या विषयांवरील घडीपत्रिकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आदर्श शेती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवारफेरीमध्ये उपस्थित असलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना देशभरात लागवडीखाली असलेल्या तब्बल ८० केळी वाणांची एकाच ठिकाणी प्रायोगीक लागवड संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर बघण्याची संधी मिळाली. यामध्ये फुले प्राईड, अर्धापुरी, वसई, श्रीमंती, ग्रँड नाईन, विल्यम्स, बसराई, राजापुरी इ. केळीच्या प्रगत वाणांच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात डॉ. अरुण भोसले यांनी विविध प्रयोग, देशी वाण, खत व्यवस्थापन व रोग व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. वैभव सूर्यवंशी यांनी तर आभार श्री. चंद्रशेखर गुळवे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले ४०० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिवजयंती उत्साहात संपन्न






**दि. १९ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, पदव्युत्तर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सवाचे आयोजन डॉ. नानासाहेब पवार सभागृहात करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून कोल्हापुर येथील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश लोळगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. सातापा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक, सौ. सुरुची खर्चे मॅडम, नगररचना व मूल्य निधी विभागाच्या रचना सहाय्यक सौ. ललिता लोळगे व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की २१ वे युग हे नवीन तंत्रज्ञानाचे, स्पर्धेचे युग आहे. यामध्ये आपण शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेऊन आपले ध्येय ठरविले पाहिजे. सातत्य, शिस्त व मेहनतीने ते ध्येय पूर्ण केले पाहिजे. शिवाजी महाराजांच्या जीवनातील तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून जनतेचा सन्मान, महिलांबद्दलचा आदर व प्रशासनातील पारदर्शकपणा जपायला हवा. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील क्षमतांची जाणीव स्वतःला करून दिली पाहिजे. आपल्या नेतृत्वामधून तसेच आपल्या कृतीतून समाजाला योग्य दिशा द्यायला हवी. शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव म्हणजे आपल्या सर्वांसाठी स्वाभिमान तसेच संस्कृती जपण्याचा व प्रेरणेचा दिवस होय.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना प्रा. गणेश लोळगे ढाल तलवारीच्या पलीकडील छत्रपती शिवराय या विषयावर बोलताना म्हणाले की रयतेचा स्वाभिमान जागा करून रयतेसाठी स्वराज्य निर्माण करणारे शिवराय हे पहिले राजे होते. शिवाजी महाराज एक उत्कृष्ट अभियंता तसेच व्यवस्थापनातील तज्ञ होते. शिवाजी महाराजांनी समुद्रबंदी मोडून व्यापार खुला केला. त्या काळात जागतिकीकरणाचा नवविचार त्यांनी प्रत्यक्षात कृतीद्वारे आणला. शिवाजी महाराजांनी ढाल तलवारीच्या पलीकडे जाऊन उत्कृष्ट व्यवस्थापनाचा धडा येथील मातीला दिला. शिवचरित्र आपल्याला निष्ठा, धैर्य, पराक्रम, प्रामाणिकपणा, कष्ट, नियोजन शिकविते. आयुष्यात कोणत्या टप्प्यावर काय करायचं याचा विचार असणारा जगातला एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी आयुष्यात यशस्वी

होण्यासाठी जगावेगळा विचार करायला हवा. शिवाजी महाराजांची शेतीविषयक धोरणे आजही दिशादर्शक आहेत. त्यांनी अवजारे तसेच धान्याच्या स्वरूपात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले. शिवाजी महाराजांचा फक्त एक गुण जरी अंगीकारता आला तरी तुम्ही तुमचे आयुष्य आत्मविश्वासाने जगाल असे ते यावेळी म्हणाले. आई–वडिलांचा आदर व त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य करणे म्हणजेच शिवचरित्र अंगीकारणे होय. शिवाजी महाराजांकडून बोध घ्या आणि स्वतःच्या जगण्याचा शोध घ्या असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थितांना केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्याची ओळख डॉ. विलास आवारी यांनी करून दिली . कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते शिवज्योतीचे पूजन करण्यात आले. यावेळी कृषि अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थिनींनी लाठ्याकाठ्यांचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर शिवज्योत मिरवणुकीने प्रशासकीय इमारतीसमोर आणून शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीत तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे व महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचा द्वितीय वर्षातील विद्यार्थी मनीष भरते याने एकपात्री प्रयोग सादर केला. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एनसीसी व एनएसएसच्या छात्रांनी श्री. गुरु तेज बहादुर साहेबजी ३५० वे शहीद समागम वर्ष साजरे केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी आदित्य उगले व विद्यार्थिनी संस्कृती सरोदे यांनी केले तर आभार पदव्युत्तर महाविद्यालयाचा विद्यार्थी सुदर्शन लाटे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी व पदव्युत्तर महाविद्यालयाचे तसेच कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या फुले निसर्ग गारवा या रसवंतीचे उद्घाटन





**दि. २७ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या परीसरात नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या फुले निसर्ग गारवा या रसवंतीचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मका संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस. एल. जाट, हैद्राबाद येथील भारतीय भरडधान्य संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. गंगाया, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील कृषिविद्या विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. आदिनाथ पसलावार, कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नरेंद्र काशीद, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे व नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. या रसवंतीगृहामध्ये विद्यापीठाने खास उसाच्या रसासाठी विकसित केलेला फुले १५०१२ या वाणापासून तयार केलेला बिना बर्फाचा शुद्ध व १००% नैसर्गिक ऊसाचा ताजा रस विक्रीस उपलब्ध राहणार आहे. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या प्रशिक्षण सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी बियाणे विभागाच्या गोडाऊनचे तसेच बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेच्या प्रक्षेत्रावर थ्रेशिंग यार्डचे भूमिपूजन केले. यावेळी बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरेश झांजरे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे भाजीपाला संशोधन केंद्र उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित



**दि. २२ फेब्रुवारी, २०२६.** भाजीपाला संशोधन संस्थेची ४४ वी वार्षिक गट बैठक श्री कोंडा लक्ष्मण तेलंगणा राज्य फलोत्पादन विद्यापीठ, हैदराबाद येथे पार पडली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित भाजीपाला पिके संशोधन प्रकल्पास उत्कृष्ट केंद्र पुरस्कार– २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा वरिष्ठ भाजीपाला पैदासकार डॉ. बी. टी. पाटील, कनिष्ठ भाजीपाला पैदासकार डॉ. शर्मिला शिंदे, कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ प्रा. चिमाजी बाचकर, कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. शालिग्राम गांगुर्डे यांनी मान्यवरांच्या हस्ते सदरचा पुरस्कार स्वीकारला. हैदराबादमधील राजेंद्रनगर येथील फलोत्पादन महाविद्यालयात संपन्न झालेल्या या बैठकीप्रसंगी तेलंगणा उद्यानविद्या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजीजी रेड्डी, तेलंगणा राज्याचे सचिव श्री. सुरेश कुमार मोहन, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक (फळ व भाजीपाला पिके) डॉ. सुधाकर पांडे, तेलंगण उद्यानविद्या विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. लक्ष्मी नारायण व इतर मान्यवर उपस्थित होते.

कृषि विद्यापीठ, राहुरी येथील भाजीपाला संशोधन प्रकल्पाच्या स्थापनेपासून आजपर्यंत ४० हून अधिक भाजीपाला पिकांचे सुधारित व संकरित वाण विकसित करण्यात आले असून त्यापैकी अनेक वाणांना केंद्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. विविध भाजीपाला पिकांबाबत शेतकरी हिताच्या महत्त्वपूर्ण १२० शिफारशी प्रसारित करण्यात आल्या आहेत तसेच अनेक संशोधनात्मक लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे भाजीपाला पिकांच्या १५ वाणांची पी.पी.व्ही. एफ. आर. ए. मध्ये नोंदणी करण्यात आली आहे. याशिवाय २५ पेक्षा अधिक जणूकांचे एन. बी. पी. जी. आर., नवी दिल्ली येथे जतन करण्यात आले आहे. एकंदरीत मागील पाच वर्षाच्या भाजीपाला प्रकल्पाच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर या प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे,संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ.साताप्पा खरबडे यांनी भाजीपाला प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी ज्यांचे यामध्ये मोलाचे योगदान लाभले त्या सर्वांचे या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले आहे. या वार्षिक बैठकीसाठी देशभरातून सुमारे ३५० शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील फळपिके संशोधन प्रकल्प उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित

**दि. २४ फेब्रुवारी, २०२६.** अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाची १३ वी वार्षिक गटचर्चा (वार्षिक आढावा बैठक) गोविंद बल्लभ कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठ, पंतनगर, उत्तराखंड येथे नुकतीच संपन्न झाली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या नेतृत्वाखाली तसेच उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या फळपिके संशोधन केंद्राने शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान दिले आहे. अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी तथा उद्यानविद्यावेत्ता डॉ. सुमती दिघे, कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ प्रा. मधुकर शेटे, कनिष्ठ किटकशास्त्रज्ञ डॉ. रणजित कडू व सहाय्यक प्राध्यापक (उद्यानविद्या) डॉ. राहुल कडू यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक (बागायती फळे व मसाला पिके) डॉ. व्ही.बी. पटेल यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार स्विकारला. उत्तराखंडमधील पंतनगर येथील कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या या बैठकीप्रसंगी पंतनगर कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एम.एस. चौहान,

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी




अ.भा.स. फळपिके संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. प्रकाश पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. या वार्षिक बैठकीसाठी देशभरात सुमारे ३०० हून अधिक शास्त्रज्ञ उपस्थित होते.

या संशोधन प्रकल्पाने स्थापनेपासून आजतागायत फळपिकांसंदर्भात ७० हून अधिक महत्त्वपूर्ण शिफारशी प्रसारित केल्या असून लिंबूवर्गीय पिकांचे ०४ सुधारित वाण विकसित केले आहेत. यामध्ये लिंबाचे साई सरबती, फुले सरबती हे वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. मोसंबीचे फुले मोसंबी व फुले रसिका (सिलेक्शन–७) या वाणांचा यामध्ये समावेश आहे. फुले मोसंबी या वाणाची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे या वाणाची ७२.९५ किलो प्रति झाड व २०.१२ टन प्रति हेक्टर एवढी उत्पादन क्षमता असून तो रोग व किडीस जादा सहनशील आहे. रसाकरीता प्रसारीत केलेल्या फुले रसिका या वाणाची उत्पादन क्षमता १६.१५ टन प्रति हेक्टर तसेच फळांची संख्या प्रति झाड ३१३ असून जीवनसत्व क ५३.१० मिली ग्रॅम प्रति १०० मिली रस एवढी आहे. महाराष्ट्राचे ६५% लिंबू लागवडीखालील क्षेत्र हे साई सरबती व फुले सरबती या वाणांखाली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला अनुक्रमे रु. ९३५ व रु. १०२.८५ कोटी एवढा ढोबळ व निव्वळ आर्थिक फायदा मिळाला आहे. मोसंबी वाणांमुळे अर्थव्यवस्थेत रु. ६१४३.८५ कोटी ढोबळ आणि रु. ४६८.६१ कोटी निव्वळ उत्पन्नाची भर पडली आहे. या संशोधन केंद्राद्वारे विविध संशोधनात्मक लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर या प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सात्ताप्पा खरबडे यांनी फळपिके संशोधन प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदानाबददल अभिनंदन केले आहे.

## महाबळेश्वर येथील संशोधन केंद्रास मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची भेट



**दि. २५ फेब्रुवारी, २०२६.** महाबळेश्वर येथील विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्रास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी भेट देऊन विविध संशोधन उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. या भेटीदरम्यान मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी प्रायोगिक क्षेत्राची पाहणी करून रब्बी हंगामात घेण्यात येत असलेल्या गहू, स्ट्रॉबेरी, मिरची, बटाटा व विदेशी भाजीपाल्यांच्या प्रयोगांची माहिती घेतली. देशातून

तसेच परदेशातून येणाऱ्या गव्हाच्या वाणांची तांबेरा रोगप्रतिकारक क्षमता तपासण्याचे महत्त्वाचे काम हे केंद्र करत असल्याबद्दल मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या स्ट्रॉबेरी संशोधन केंद्राच्या बांधकामाची पाहणी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केली. यावेळी स्ट्रॉबेरी सोबतच इतर उद्यानविद्या पिकांच्या प्रायोगिक चाचण्या सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले. याप्रसंगी  संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कोल्हापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड, प्रभारी गहू गेरवा कवकशास्त्रज्ञ डॉ. दर्शन कदम, कनिष्ठ गहू रोगशास्त्रज्ञ डॉ. मनीष सुषिर व कनिष्ठ वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. विक्रांत साळी उपस्थित होते. यावेळी डॉ. दर्शन कदम आणि डॉ. मनीष सुषिर यांनी प्रायोगिक क्षेत्र काचगृह येथील संशोधन प्रयोग आणि पीक रोग निदान केंद्र प्रकल्पाची माहिती देऊन संशोधन केंद्रावरील उपक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. विक्रांत साळी यांनी आभार मानले. याप्रसंगी संशोधन केंद्राची सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची संत मुक्ताई कृषि महाविद्यालयास भेट






**दि. ४ फेब्रुवारी २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान महाविद्यालयातील शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी कुलगुरूंचे शाल, श्रीफळ, मुक्ताई देवीची प्रतिमा, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. यावेळी डॉ. संदिप पाटील यांनी महाविद्यालयातील अध्यापन पद्धती, शैक्षणिक गुणवत्ता, सुरू असलेले उपक्रम, विद्यार्थी सहभाग तसेच भविष्यातील विकास आराखड्याची माहिती सादर केली. भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधून प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी जाणून घेतल्या आणि आवश्यक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी पदव्युत्तर शिक्षण, करिअर संधी व स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी सातत्य, शिस्त व समर्पण आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी संशोधन, उद्योजकता व विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून कृषि क्षेत्राच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

मार्गदर्शनपर भाषणात मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी मर्यादित संसाधनांमध्येही सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली यांचे मानांकन प्राप्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सखोल मार्गदर्शन केले. नवोन्मेषी अध्यापन, डिजिटल साधनांचा वापर व संशोधनाभिमुख दृष्टिकोन यावर भर देण्याचे त्यांनी सुचविले. यानंतर त्यांनी महाविद्यालय प्रक्षेत्र, प्रात्यक्षिक घटक, ग्रंथालय व वसतिगृहे यांना भेट देऊन सुविधांचा आढावा घेतला. तसेच प्रयोगशाळा, अनुभवाधिष्ठित शिक्षण प्रात्यक्षिके व गांडूळ खत (वर्मी कंपोस्ट) युनिटची पाहणी केली. याचवेळी त्यांच्या हस्ते सातपुडा जातीच्या कुक्कुटपालन युनिटचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, श्री. प्रशांत नागे, श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पारडे, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील, श्री. भूषण जगताप, श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. गणेश गावंडे, श्रीमती वर्षा सोमाणी तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. सागर पाटील यांनी केले.

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## डॉ. मिलिंद अहिरे यांना डॉ. वाय. पी. सिंघ मेमोरिअल पुरस्कार प्रदान




**दि. ६ फेब्रुवारी,२०२६.** डॉ. मिलिंद आहिरे यांनी शिक्षण, संशोधन आणि विस्तार संशोधनातील प्राविण्य आणि विस्तार शिक्षणामध्ये केलेल्या दैदिप्यमान कार्याबद्दल नवी दिल्ली येथील भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीचा मानाचा मानला जाणारा डॉ. वाय. पी. सिंग मेमोरियल पुरस्कार २०२६-२७ देऊन त्यांना गौरविण्यात आले. भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीचा गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय परिसंवादात भारतीय कृषि संशोधन परिषदेचे सहाय्यक महासंचालक डॉ. आर. के. सिंग आणि माजी उपमहासंचालक डॉ. यु. एस. गौतम यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार डॉ. मिलिंद आहिरे यांना देण्यात आला.

## कृषि महाविद्यालय, संशोधन केंद्र व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कवठे येथे निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. ११ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व आत्मा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन कवठे येथील कृषिक्रांती शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये आयोजित करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय समन्वित बटाटा संशोधन केंद्राचे प्राध्यापक डॉ. रवींद्र पवार, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर, मंडल कृषि अधिकारी श्री. निखिल रायकर, कृषिक्रांती शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष श्री. अतुल डेरे, बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) डॉ. भूषण यादगिरवार व नेटाफिम कंपनीचे श्री. सतीश राठोड उपस्थित होते. भारत सरकारने आगामी पाच वर्षात केळीची निर्यात एक अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी रेल्वे आणि सागरी मार्गांचा वापर वाढवला जात आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यात निर्यातक्षम केळीची लागवड वाढावी यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. रवींद्र पवार यांनी सातारा जिल्ह्यात केळी लागवडीत वाढ होत असून उत्पादन हेक्टरी ४० टनांपर्यंत पोहोचले आहे, मात्र निर्यातीचे प्रमाण अत्यंत कमी आहे, त्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्यांनी सादरीकरण करताना केळी घडांना स्कर्टिंग बॅगचा वापर, फणीच्या वजन वाढीसाठी विद्राव्य खतांचा वापर, कीड रोग व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. महेश बाबर यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने उत्पादन करून

निर्यात करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. श्री. अतुल डेरे यांनी रसायनाचा कमी वापर आणि योग्य काढणीपश्चात प्रक्रिया महत्त्वाची असते असे नमूद केले. निर्यातीमध्ये प्रमुख निर्यात देशांमध्ये यूएई, ओमान, इराण, सौदी अरेबिया, नेपाळ आणि रशिया या देशांमध्ये भारताकडून केळीची निर्यात केली जाते. जागतिक बाजारपेठेत निर्यात करण्यासाठी ग्लोबल गॅप प्रमाणपत्र मिळवणे फायदेशीर ठरते असे ते म्हणाले. नेटाफीमचे श्री.सतीश राठोड यांनी खत आणि पाणी देताना ठिबक सिंचनाचा वापर करून गरजेनुसार खते द्यावीत असे सांगितले. या कार्यक्रमासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. राहुल डेरे, कृषि अधिकारी श्री. कुणाला नेवसे, श्री. योगेश जायकर उपस्थित होते.

## किन्वित सेंद्रिय खत प्रात्यक्षिक अंतर्गत शिवारफेरी संपन्न






**दि. ६ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत असलेल्या बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्र व महाराष्ट्र शासन कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे शेळकेवाडी तालुका जिल्हा सातारा येथे किन्वित सेंद्रिय खत प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिविक्षाधीन गटविकास अधिकारी सौ. परागिणी पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषि अधिकारी श्री. तेजदीप ढगे उपस्थित होते. यावेळी बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे उद्यानविद्या विभागाचे विषयी विशेषज्ञ श्री. भूषण यादगिरवार यांनी या प्रकल्पाविषयी माहिती देताना सांगितले की भारत सरकारच्या गोबरधन योजनेअंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांनी काही प्रमुख पिकांसाठी किन्वित सेंद्रिय खत आधारित खत व्यवस्थापन पद्धतीची शिफारस केली आहे. जमिनीच्या सुपीकतेसाठी उपयुक्त व पर्यावरण पूरक अशी ही पद्धत आहे. त्या माध्यमातून मौजे शेळकेवाडी येथे ऊस पिकात दहा शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर व कृषि विज्ञान केंद्र, बोरगावच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या शेतकऱ्यांना भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शिफारशी प्रमाणे किन्वित सेंद्रिय खत वितरित करण्यात आले आहे.

यावेळी श्री. प्रकाश चव्हाण व श्री. प्रवीण नलावडे यांनी महाविस्तार एआय एफची माहिती दिली. श्री. धनाजी फडतरे यांनी नमूद केले की कृषि विज्ञान केंद्र, बोरगावद्वारे व महाराष्ट्र शासन, कृषि विभाग यांच्या सहकार्याने या गावात किन्वित सेंद्रिय खत प्रकल्प अंतर्गत माती नमुने प्रयोगशाळेत तपासणी करून त्या आधारे खत व्यवस्थापन करण्यासाठी व किन्वित सेंद्रिय खताचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. याप्रसंगी श्री. प्रवीण शेळके यांच्या प्रक्षेत्रावर स्थापना करण्यात आलेल्या अवजारे बँकेची पाहणी उपस्थित अधिकाऱ्यांनी केली.

## संतोष मुळीक यांच्या सेंद्रिय देशी केळी बागेला गुजरात व महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व शास्त्रज्ञ यांची भेट

**दि.१३ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व अटारी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने किन्वित सेंद्रिय खताच्या वापराबाबत जागृती कार्यक्रम व पीक प्रात्यक्षिकांचा आढावा घेण्यासाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेदरम्यान मौ. सोनगाव, ता. जि. सातारा येथील शेतकरी श्री. संतोष मुळीक यांच्या देशी केळी बागेला गुजरात व महाराष्ट्र राज्याचे कृषि विज्ञान केंद्रातील वरिष्ठ शास्त्रज्ञ तसेच विषय विशेषज्ञ यांनी भेट दिली. याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, अटारी, पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. तुषार आठरे, बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. महेश बाबर, विषय विशेषज्ञ श्री. भूषण यादगिरवार, श्री. संग्राम पाटील, श्री. धनाजी फडतरे उपस्थित होते. या भेटीदरम्यान शास्त्रज्ञांनी श्री. मुळीक यांच्याकडून नैसर्गिकरित्या उत्पादन घेत असलेल्या





केळी बागेचे बारकावे जाणून घेतले. यावेळी श्री. जगन्नाथ मुळीक, श्री. श्रीधर मोरे, श्री. विश्वास नावडकर, श्री. शशिकांत जाधव इत्यादी शेतकरी उपस्थित होते. यावेळी बागेविषयी माहिती देताना श्री. मुळीक म्हणाले की ही देशी केळी बाग संपूर्ण सेंद्रिय असून कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत हे प्रक्षेत्र आहे. या बागेतील खोड व पाने बागेतच टाकून घनजीवामृत, जीवामृत व वेस्ट डीकंपोजर वापरून कुजविले जातात. शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करून आतापर्यंत आठ खोडवा पिके घेतली आहेत. केळी घडाची काढणी केल्यानंतर केळी पिकविण्यासाठी कपड्यांनी झाकून नैसर्गिक पद्धतीने पिकविले जातात. उत्कृष्ट, दर्जेदार व सेंद्रिय पद्धतीने पिकविलेल्या केळींची घरूनच विक्री केली जाते. केळीची चव उत्कृष्ट असल्याने जागेवरूनच संपूर्ण विक्री होते. या भेटीनंतर शेळकेवाडी येथील किन्वित सेंद्रिय खताच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला भेट देण्यात आली. श्री. संतोष मुळीक यांनी उपस्थित शास्त्रज्ञांचे स्वागत केले व सहाय्यक कृषि अधिकारी श्री. धनाजी फडतरे यांनी आभार मानले.

## पिलखोड येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन




**दि. १० फेब्रुवारी, २०२६.** चाळीसगाव तालुक्यातील पिलखोड येथील कृषि तंत्र विद्यालय, पिलखोड येथे कृषि महाविद्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे होते. यावेळी धुळे येथील कृषि विज्ञान केंद्राचे कृषिविद्या विषयाचे विषयतज्ञ डॉ. जगदीश काथेपुरी, कृषि महाविद्यालय, धुळे येथील कीटकशास्त्र विभागाचे प्रा. नितीश घोडके, कृषि विस्तार शिक्षण विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. जे. एच. गायकवाड, नवयुवक सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे उपाध्यक्ष श्री. प्रकाश बाविस्कर, संस्थेचे सचिव श्री. गोकुळ बाविस्कर, प्राचार्य श्री.रमेश महाजन, पिलखोडचे सरपंच श्री. भिमराव यशोद, मंदूरने सरपंच राजेंद्र पाटील, उपखेडचे सरपंच श्री. दिनकर मगर उपस्थित होते.

यावेळी डॉ. बी.एम. इल्हे मार्गदर्शन करताना म्हणाले की रासायनिक खतांच्या वापराऐवजी जिवाणू खते तसेच नैसर्गिक खतांचा वापर हा जमिनीच्या सुपीकतेच्या दृष्टीने आणि पिकांच्या सुदृढ वाढीसाठी फार महत्त्वाचा आहे. यावेळी झालेल्या तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. जगदीश

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

काथेपुरी यांनी मका व कापूस पिकाचे उत्पादन तंत्रज्ञान, प्रा. नितीश घोडके यांनी ऊस पिकावरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच ऊस, मका, कापूस या तीनही पिकांचे लागवडीचे संपूर्ण तंत्र शास्त्रीय पद्धतीने सांगण्यात आले. यावेळी शेतकरी मेळाव्यामध्ये योग्य लागवडीचे अंतर, मातीच्या सुपीकतेनुसार वाणांची निवड, नत्राचे संतुलित प्रमाण, सेंद्रिय खत तसेच हिरवळीचे खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, पाण्याचे नियोजन अशा महत्त्वपूर्ण बाबींविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे.एच. गायकवाड यांनी केले. अंकित पवार व राहुल येडवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आदित्य पुरी यांनी आभार मानले. या शेतकरी मेळाव्यासाठी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे मधुमक्षिकापालन विषयावरील प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न






**दि. २३ फेब्रुवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, धुळे आणि केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे कृषि महाविद्यालयामध्ये मधुमक्षिकापालन प्रशिक्षण तथा कार्यशाळेचे आयोजन कीटकशास्त्र विभागात करण्यात आले होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये मधुमक्षिका पालनासाठी उपयुक्त जाती, मधमाशीच्या पोळ्यामधील सामाजिक रचना व ओळख, मधपेट्यांमधील फ्रेमपासून मेण काढणे, मधपेटीमधील फ्रेममध्ये मेणाची पायाभूत शीट बसविणे, मधमाशीच्या नवीन वसाहती पकडण्यासाठी उपाययोजना, मधमाशीपासून मधाव्यतिरिक्त मिळणारी विविध उत्पादने, मधुमक्षिकापालनासाठी आवश्यक प्राथमिक गरजा व ढोबळ अर्थकारण, यशस्वीरित्या मधुमक्षिकापालन करणाऱ्या उद्योजकांसोबत ऑनलाइन चर्चा इत्यादी बाबींवर भर देण्यात आला. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना डॉ. बी. एम. इल्हे तसेच पशुविज्ञान विभागाचे डॉ. आर. जे. देसले यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुण्याचे प्रशिक्षक श्री. हेमंत डुंबरे, डॉ. पंकज देवरे, श्री. जे. एस. सूर्यवंशी, डॉ. वैष्णवी ताथोडे, डॉ. अनिल माळी व डॉ. अनिरुद्ध देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून डॉ. नितीश घोडके यांनी जबाबदारी पार पाडली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कीटकशास्त्र विभागातील डॉ. वैष्णवी ताथोडे, सौ.मनीषा मोरे, कीटकशास्त्र तसेच वनस्पती रोगशास्त्र मॉडेलचे विद्यार्थी, कीटकशास्त्र विभागाचे पदव्युत्तर विद्यार्थी व तुषार चित्ते यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील तृतीय आणि चतुर्थ वर्षात शिकणारे १०५ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दि. १९ फेब्रुवारी, २०२६.** विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सुनील कराड यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, नेतृत्व गुण व राष्ट्रनिष्ठ कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या आदर्शापासून प्रेरणा घेऊन कर्तव्यनिष्ठा व प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त



केला. यावेळी मृदाशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रवीण गजभिये, मका कृषिविद्यावेत्ता डॉ. सुहास भिंगारदिवे, सहाय्यक प्राध्यापक कृषिविद्यावेता डॉ. योगेश बन, कृषि अर्थशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाबासाहेब कांबळे, श्री. सुहास साळुंखे, श्री. मयूर सुतार, श्री. भरत पाटील, श्री. सागर शेळके, श्रीमती शितल देशमुख, श्री. अनिकेत बोरचाटे व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदुरबार कृषि महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न





**दि. २६ फेब्रुवारी, २०२६.** नंदुरबार येथील कृषि महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठता डॉ. यू. बी. होले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. शंकर किरवे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. पी. पी. गिरासे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. दिनेश सूर्यवंशी, सहाय्यक कुलसचिव प्रा. साहेबराव पाटोळे, विद्यार्थी परिषद सभापती धनराज वसावे आणि सचिव नीलम पाडवी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. होले म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुपेक्षाही उंच शिखर गाठणे यातच शिक्षकाचा खरा आनंद असतो. महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे हक्काचे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी वैयक्तिक विकासासोबतच महाविद्यालय आणि विद्यापीठाचे नाव उज्वल करावे. यावेळी श्री. शंकर किरवे मार्गदर्शन करताना म्हणाले की सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. पुणे, मुंबई यासारख्या शहरातील सुविधांच्या धरतीवर विद्यार्थ्यांनी स्वतःला तयार करून स्पर्धेत उतरावे. पदवीच्या पहिल्या वर्षापासूनच आपले ध्येय निश्चित केल्यास जागतिक स्तरावरील संधी हस्तगत करणे सहज शक्य होईल. यावेळी डॉ. पी.पी. गिरासे यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक प्रगतीचा आढावा सादर केला. याप्रसंगी शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. दिनेश सूर्यवंशी यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर गावित, प्रांजली वसावे, मनोज ठाकरे, प्रेरणा पवार, गिरीश बाबर, सायली वाघमोडे, प्रिया साबळे आणि मयुरी चौरे या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी डॉ. दीपककुमार अहिरे, डॉ. शेंडे, डॉ. वाघ, डॉ. बलसाने, पालक, शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे बीएएसएफ सुरक्षा हमेशा उपक्रमांतर्गत एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न






**दि. २५ फेब्रुवारी, २०२६.** मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव आणि बीएएसएफ इंडिया लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाडेगाव येथे सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत शेतीमध्ये वापरण्यात येणारे विविध रसायने आणि स्वतःचे संरक्षण या विषयावर सुरक्षा हमेशा अंतर्गत अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी यांच्यासाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी बीएएसएफ कंपनीचे संशोधन व वितरण विभागाचे डॉ. अमोल शितोळे, श्री. अण्णासाहेब शेडगे,श्री. धनंजय परकाळे, ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे, डॉ. दत्तात्रय थोरवे व डॉ. माधवी शेळके उपस्थित होते.

यावेळी डॉ. राजेंद्र भिलारे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना माहिती देताना उसाच्या एकरी १०० टन ऊस उत्पादन व अधिक साखर उतारा देणाऱ्या नवीन सुधारित वाणांचा विकास करणे तसेच ऊस उत्पादन तंत्रज्ञान यावर पाडेगाव येथील संशोधन केंद्रामध्ये प्रामुख्याने भर दिला जात असल्याचे सांगितले. उत्पादन वाढीसाठी शेतीमध्ये तणनाशके, कीटकनाशके, बुरशीनाशके व संजीवकांचा वापर ही काळाची गरज बनलेली आहेत अशी रसायने योग्य प्रमाणात, योग्य वेळी, योग्य मात्रेत, योग्य संरक्षण सुरक्षा उपकरणे व सावधगिरी बाळगत फवारणी केल्यास चांगले परिणाम दिसण्यास मदत करतात. याप्रसंगी डॉ. अमोल शितोळे यांनी आपल्या सादरीकरणांमध्ये माहिती देताना सांगितले की बीएएसएफ इंडिया लि. ही कंपनी भारतात गेल्या ८० वर्षांपासून शेतकऱ्यांसोबत काम करणारी एक आघाडीची कृषि रसायन कंपनी आहे. शेतीविषयक रसायन उत्पादन व विक्रीबरोबरच सदर उत्पादनांचा सुरक्षित वापर कसा करावा या अंतर्गत सुरक्षा हमेशा हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवित आहे. सुरक्षा हमेशा या उपक्रमाचा सविस्तर अर्थ नेहमी सुरक्षा किंवा सतत सुरक्षितता असा होतो. त्या अनुषंगाने शेतकरी व शेतांमध्ये फवारणी करणाऱ्या शेतकऱ्यांना रासायनिक औषधांचा जबाबदारीने वापर कसा करावा आणि कीटकनाशकांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे हा बीएएसएफचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी सुरक्षिततेच्या नऊ पायऱ्यांवर भर दिला जातो. यामध्ये कीटकनाशक खरेदी करण्यापूर्वी/ वापरण्यापूर्वी लेबल वाचावे, पीपीई संरक्षण किटचा वापर करावा, रासायनिक औषधे साठवणूक करताना ती थंड ठिकाणी व मोकळ्या रिकाम्या जागेवरती कडी कुलूप लावून ठेवावी, औषधांचे द्रावण तयार करताना हाताने ढवळू नये,वाऱ्याच्या दिशेने सुरक्षितपणे फवारणी करावी, फवारणी करताना पाणी पिणे किंवा खाणे टाळावे, औषधे फवारणी केल्यानंतर त्यांच्या बॉटल पाण्याने चांगल्या स्वच्छ करून खालच्या बाजूने कापून त्या जमिनीमध्ये गाडाव्यात, पीपीइ संरक्षण किट स्वच्छ करावे, फवारणीनंतर आंघोळ करावी इ. गोष्टींचा अवलंब करावा. त्यामुळे औषधे फवारणी करतांना त्याचा शरीराच्या कोणत्याही अवयवांवर दुष्परिणाम होणार नाही. श्री. अण्णासाहेब शेडगे व श्री. धनंजय परकाळे यांनी औषधे फवारणी करतांना सुरक्षा किटचा वापर कसा करावा याबद्दल प्रत्यक्ष शेतकऱ्यांसमोर पीपीई किटचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी बीएएसएफ, इंडिया लि.,पुणे यांचे मार्फत शेतकऱ्यांना संरक्षण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सुरज नलावडे यांनीही उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरज नलावडे यांनी तर आभार डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संशोधन केंद्रातील श्री. राजेंद्र पांढरे, श्री. लाला सावंत, श्री. अनिल डुबल आणि सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

फेब्रुवारी २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## पंढरपूर येथील कृषि संशोधन केंद्रावर फुले कृषि महोत्सव साजरा





**दि. ११ फेब्रुवारी, २०२६.** कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूर व उपविभागीय कृषि अधिकारी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर येथील कृषि संशोधन केंद्रावर कृषि महोत्सव २०२६ च्या अनुषंगाने पीक प्रात्यक्षिक, हरभरा दिवस व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. फुले कृषि महोत्सवाचे औचित्य साधून संशोधन केंद्रावर पीक प्रात्यक्षिक व शिवारफेरी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी सोलापूर येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीन रणशूर उपस्थित होते. यावेळी कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे, करडई पैदासकार डॉ. हितेंद्रसिंह राजपूत, मोहोळ कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. तानाजी वाळकुंडे, पंढरपूरचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. बाळासाहेब लांडगे, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. गणपत बागल व तालुका कृषि अधिकारी, सांगोला सौ. दिपाली जाधव उपस्थित होते.

यावेळी डॉ. नितीन रणशूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हरभरा उत्पादनातील समस्या व त्यावरील विद्यापीठात सुरू असलेले संशोधन तसेच आधुनिक शेतीत एआय तंत्रज्ञानाचा वापर याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. रमेश भदाणे यावेळी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की रब्बी हंगामातील हरभरा हे कडधान्य पीक शेतकऱ्यांसाठी आर्थिक तसेच जमिनीचा पोत सुधारण्यासाठी खूप फायदेशीर आहे. प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्यामुळे मानवी आहारातही हरभरा पिकाचे महत्त्व आहे. कमी खर्चात जास्त उत्पन्नासाठी शेतकऱ्यांनी हरभरा पिकाचा वापर करावा असे ते आपल्या मार्गदर्शनात म्हणाले. डॉ. तानाजी वाळकुंडे यांनी मूरघास तयार करण्याची पद्धत आणि वापर, डॉ. हितेंद्रसिंह राजपूत यांनी करडई व ज्वारी पिकाचे लागवड तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले. श्री. बाळासाहेब लांडगे यांनी राज्य शासनाच्या शेती व शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांना हरभरा, करडई, सूर्यफूल, गहू, ज्वारी, भुईमूग, चवळी, जवस इत्यादी रब्बी हंगामातील एकूण ५९ वाणांची पीक प्रात्यक्षिके पाहायला मिळाली. यावेळी हरभरा पिकाचे सरासरी उत्पादन वाढीसाठी संशोधन केंद्रावर राबवण्यात आलेल्या हरभरा बीज उत्पादन कार्यक्रमाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रामचंद्र बनसोडे यांनी तर आभार सौ. दिपाली जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संशोधन केंद्रावर कार्यरत असलेले कर्मचारी श्री. लक्ष्मण नरोडे, श्री. विकास काळे, श्री. समाधान गवळी, श्री. संतोष होडगीकर, श्री. संतोष देशमुख, श्री. सोमनाथ वाघज यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथील हवामानशास्त्र विभागामध्ये दहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ४ फेब्रुवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील हवामानशास्त्र विभागामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस यांचा कृषि हवामानशास्त्रातील वापर या विषयावर देशभरातील शास्त्रज्ञांकरिता दहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गुजरात मधील आनंद कृषि विद्यापीठ आणि कामधेनू पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. सी. वार्ष्णेय उपस्थित होते. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, गणेशखिंड येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर व हवामानशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख व प्रशिक्षण केंद्र निदेशक डॉ. प्रांजली बगाडे उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. एम. सी. वार्ष्णेय आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की पावसाचा अचूक अंदाज हा शेती नियोजनाचा कणा असून शेतकऱ्यांचे






संपूर्ण जीवन हवामान आधारित संशोधनावर अवलंबून आहे. हवामान शास्त्रज्ञ पाऊस व तापमान यावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत ही शास्त्रज्ञांची मर्यादा असून अचूक हवामान अंदाजासाठी अनेक वर्षांची अचूक व सातत्यपूर्ण माहिती संकलित करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सातप्पा खरबडे यांनी बदलत्या हवामानामुळे पीक उत्पादन पद्धतीत बदल करणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. महानंद माने यांनी रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस ही संशोधनासाठी उपयुक्त साधने असल्याचे सांगत त्यांचा प्रभावी वापर करण्यासाठी मूलभूत ज्ञान आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात साधने बदलू शकतात मात्र भक्कम संशोधनासाठी मूलभूत संकल्पनांचे ज्ञान अपरिहार्य असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रांजली बगाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष यादव यांनी तर आभार डॉ. सुहास उपाध्ये यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व गुजरात, केरळ, ओडिसा आणि महाराष्ट्र राज्यातील एकूण २५ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## पुरंदर तालुक्यातील परिंचे येथे भ्रूण प्रत्यारोपण प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ





**दि. २५ फेब्रुवारी, २०२६.** देशी गोवंश संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी भ्रूण प्रत्यारोपण प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ पुरंदर तालुक्यातील परिंचे येथे करण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानंतर राज्यातील देशी गोवंश संवर्धन कार्यक्रमाला नवे बळ मिळाले आहे. त्या कराराच्या अंमलबजावणीतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. दुसऱ्या टप्प्याअंतर्गत १६ निवडक गाईंमध्ये उच्च जनुकीय क्षमतेच्या साहिवाल जातीचे भ्रूण यशस्वीरित्या प्रत्यारोपित करण्यात आले. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे भविष्यात प्रतिवेत ३००० लिटरपेक्षा अधिक दूध देण्याची क्षमता असलेल्या साहिवाल, गीर, राठी तसेच डांगी व खिल्लार जातींच्या उच्च वंशावळीच्या गाई शेतकऱ्यांच्या गोठ्यात तयार होणार आहेत. या उपक्रमामुळे देशी गोवंश संवर्धन जनुकीय सुधारणा दूध उत्पादन वाढीस चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संशोधन संचालक डॉ. प्रशांत

बोडके, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शीतलकुमार मुकणे आणि प्रकल्प समन्वयक डॉ. विष्णू नरवडे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व भ्रूण प्रत्यारोपण तज्ञ डॉ. विष्णू जवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ञ पथकाने प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन भ्रूण प्रत्यारोपणाची प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी पशुधन विकास अधिकारी, विस्तार पंचायत समिती, पुरंदर डॉ. अस्मिता साताळकर, पशुवैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय चिकित्सालय, परिंचे डॉ. अर्चना जगताप तसेच पशुचिकित्सालय राजेवाडीचे प्रतिनिधी श्री. रविराज ताकवले उपस्थित होते. परिंचे येथील पशुपालक श्री. अरविंद गुळंबे, श्री. हिम्मतराव जाधव, श्री. रामचंद्र सूर्यवंशी, हरगुडे येथील श्री. सुशील ताकवले, श्री. सचिन ताकवले, श्री. भूषण ताकवले, श्री. संतोष ताकवले, श्री. किशोर यादव, श्री. सूर्यकांत ताकवले यांच्या गाईंमध्ये भ्रूण प्रत्यारोपण करण्यात आले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर





**दि. ४ फेब्रुवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे सुरु होऊन जवळपास तीन वर्ष पूर्ण होत आहेत. महाविद्यालयामार्फत कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या प्रगत तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य जोमाने सुरु आहे. पंचक्रोशीतील शेतकरी या तंत्रज्ञानाचा वापर प्रत्येक हंगामात करत आहेत. त्याअनुषंगाने, महाविद्यालयाचे मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे, वनस्पती रोगशास्त्र तज्ञ डॉ. मनोज गुड, उद्यानविद्या तज्ञ प्रा. पोपटराव पवार, कृषिविद्या तज्ञ डॉ. अंबादास मेहेत्रे यांच्या पथकाने जवळा येथे शेत शिवार या उपक्रमाअंतर्गत अनेक प्रगतशील शेतकरी यांचे विद्यापीठ निर्मित फुले समाधान गहू, साई सरबती व फुले सरबती कागदी लिंबू फळबाग व मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथील ऊस फुले १५०१२ व १३००७ या नवीन ऊस वाणांच्या प्लॉटची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. अधिक उत्पादन घेण्यासाठी बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, जैविक खते, विद्यापीठ निर्मित फुले सुपर बायोमिक्स, ऊस पाचट कुजविण्यासाठीचे द्रावण व पीक व्यवस्थापन याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे तज्ञांनी अतिशय समर्पकरित्या निरसन केले. सदर कार्यक्रमास २५ शेतकरी बांधव उपस्थित होते.

## हाळगावच्या शासकीय कृषि महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन

**दि. ६ फेब्रुवारी, २०२६.** हाळगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालयात सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी विद्यार्थी परिषद उपाध्यिक्षा डॉ. प्रेरणा भोसले, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सहाय्यक प्राध्यापक वनस्पती रोगशास्त्र डॉ. मनोज गुड, नेत्रचिकित्सा अधिकारी श्री. रामानंद चाळक, वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. दत्तात्रय सोनवणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की मानवी शरीरात डोळे हे सर्वात मौल्यवान आणि संवेदनशील ज्ञानेंद्रिय आहे. डोळे हे सौंदर्याचा आणि जग पाहण्याचा एकमेव मार्ग आहेत, म्हणून त्यांची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. आजच्या आधुनिक जगात युवा पिढी वाचनाची सवय विसरून सोशल मिडीयाच्या आहारी गेली आहे. दैनंदिन चुकीच्या सवयी व असंतुलित आहारामुळे डोळ्यांचे अनेक विकार



जडले आहेत. निसर्गाने निर्माण केलेली ही सुंदर सृष्टी पाहायची असेल तर डोळ्यांची नियमित तपासणी करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र, राशीन येथील नेत्रचिकित्सा अधिकारी श्री. रामानंद चाळक यांनी डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी घ्यावयाची काळजी, नेत्र तपासणी व नेत्र दानाची गरज या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. तसेच, संतुलित आहार, डोळ्यांचे व्यायाम व सोशल मिडीयाचा योग्य वापर करण्यासाठी आवाहन केले. महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर यांनी शिबिराच्या आयोजनामध्ये विशेष भूमिका बजावली. सदर शिबिरात एकूण ९४ कर्मचारी व विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्र तपासणी कार्यक्रम कर्मचारी व विद्यार्थी यांच्या डोळ्यांचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहाय्यक प्राध्यापिका कृषि विस्तार डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले. शिबिरात विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे संत रविदास महाराज यांची जयंती साजरी



**दि. १२ फेब्रुवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरूवात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी समतेचे आद्य प्रवर्तक व कुलभुषण कवी म्हणून असलेली त्यांची ओळख उपस्थितांना करुन दिली. सामाजिक भेदभाव न करता सर्व मानव जात एक आहे असा संदेश तसेच सामाजिक एकोप्याची अनेक उदाहरणे त्यांनी आपल्या दोह्यांतून मांडत समाज प्रबोधन केले अशी माहिती त्यांनी मनोगतातून सांगितली. स्वयंसेवक चि. सुधाकर बोत्रे, कुमारी निशा पाचरणे यांनी संत रविदास महाराज यांच्या प्रेरणादायी कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील विद्यार्थ्यांची फुले कृषि महोत्सवास भेट





**दि. १८ फेब्रुवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या फुले कृषि महोत्सव २०२६ यांस दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व कार्यक्षेत्रातील शेतकरी गटातील शेतकऱ्यांनी भेट दिली. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर भेटीचे नियोजन करण्यात आले होते. विद्यापीठात दिवसेंदिवस विकसित होणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना व्हावी हा त्यामागचा हेतू होता. सदर महोत्सवात विद्यार्थ्यांनी व शेतकऱ्यांनी विविध पिकांची प्रात्यक्षिके, ज्वारी, कडधान्य, तेलबिया, तृणधान्य, भाजीपाला पिकांचे वाण, विविध प्रकल्प इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेतला. महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन, सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. निकीता धाडगे, डॉ. धनेश्वर पाटील, शिक्षकेतर कर्मचारी श्री. सुरेश माकरे, श्री. अनिकेत कुंभार, ३५ विद्यार्थी आणि शेतकरी गटातील २५ शेतकऱ्यांनी हा अभ्यासदौरा यशस्वीपणे पूर्ण केला.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**दि. २० फेब्रुवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. स्वयंसेवक चि. सुमित भुजबळ यांनी मराठी वृत्तपत्राचे जनक, दर्पणकार, आद्य साहित्यीक, समाज सुधारक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती सांगितली. पारतंत्र्याने ग्रासलेला देश, याबरोबरच समाजातील अनेक रूढी, चालीरीती, अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यामुळे व्याधिग्रस्त झालेल्या समाजाला प्रबोधित करण्यासाठी त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले, सार्वजनिक गंथालयांचे महत्त्व ओळखून बाँबे नेटिव्ह जनरल लायब्ररी या ग्रंथालयाची स्थापना केली, विधवा पुनर्विवाह व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या समाजात प्रसार यासाठी त्यांनी विशेष कार्य केले असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी

**दि. २३ फेब्रुवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर स्वयंसेवक चि. अक्षय कोडलिंगे, कुमारी पायल देशमुख यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती सांगितली. गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील कीर्तनकार संत आणि एक समाज सुधारक होते, ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावात भटकत असत, दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यथित केले, त्यांचे कीर्तन म्हणजे लोक प्रबोधनाचा एक भाग असे. ते आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा, रूढी परंपरा यावर टीका करत.



समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी क्रांती चटाले यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांची ३५० वी शहीदी समागम साजरी



**दि. २४ फेब्रुवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत हिंद की चादर श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांची ३५० वी शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास माहित व्हावा, तसेच त्यांनी शीख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा या बाबत प्रचार व दिलेले बलिदान यांचे स्मरण होण्याकरीता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदानावरील चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, विद्यार्थी परिषद उपाध्यक्षा डॉ. प्रेरणा भोसले, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड तसेच इतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्षाची स्वयंसेवक कुमारी प्रिती कवळे व आभार प्रदर्शन चतुर्थ वर्षाचा स्वयंसेवक चि. हर्षल काकडे यांनी केले.

## शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगावच्या विद्यार्थ्यांचा भारतीय भरड धान्य संशोधन संस्था, हैद्राबाद येथील १० दिवसीय प्रशिक्षणात सहभाग

**दि. २६ फेब्रुवारी,२०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगावचे मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६ ते २६ फेब्रुवारी,२०२६ या कालावधीत भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या अंतर्गत कार्यरत भारतीय



भरड धान्य संशोधन संस्था, हैद्राबाद येथे आयोजित जिनोमिक्स, ऊती संवर्धन, मायक्रोस्कोपी आणि धान्य विज्ञानातील प्रगत प्रयोगशाळा तंत्रज्ञान या विषयातील १० दिवसीय प्रशिक्षणात महाविद्यालयातील एकूण सहा विद्यार्थी सहभागी झाले. यामध्ये कृषि पदवीच्या चतुर्थ वर्षात आठव्या सत्रात शिक्षण घेत असलेले चि. हर्षद बाबासाहेब बलसाने, कु. साक्षी नरेंद्र खंदारे, कु. मिनल नरेंद्र कुवर, कु. नम्रता नवनाथ कदम, कु. आरती लाला गायकवाड आणि कु. पायल नारायण इंगळे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा तंत्रज्ञानातील प्रगत, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व कौशल्य अवगत व्हावे हा त्या मागचा उद्देश होता. सदर प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळा सुरक्षा आणि उपकरणे परिचय, प्रगत मायक्रोस्कोपी: जैविक इमेजिंग तंत्र आणि व्यावसायिक मूल्ये, प्रगत मायक्रोस्कोपी: नमुना तयार करण्याची तंत्रे, स्पेक्ट्रोफोटोमेट्रिक विश्लेषण आणि व्यावसायिक मूल्ये, सेमिओ–केमिकल्स विलगीकरण, ओळख, संश्लेषण आणि व्यावसायिक मूल्ये, डीएनए एक्सट्रॅक्शन आणि जेल इलेक्ट्रोफोरेसिस, आरएनए एक्सट्रॅक्शन, पीसीआर, क्रोमॅटोग्राफी तंत्र, बायो पेस्टिसाइड्स, बायो–स्टिम्युलंट्स, फॉर्म्युलेशन आणि व्यावसायिक मूल्ये या बाबतचे ज्ञान अवगत केले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल डॉ. दत्तात्रय सोनवणे, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. मनोज गुड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन





**दि. १६ फेब्रुवारी २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राज्यपाल सचिवालय, लोकभवन, मलबार हिल, मुंबई यांच्या निर्देशानुसार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी नमूद केले की, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभागामार्फत अंमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठी नशामुक्त भारत अभियान ही जागरूकता मोहीम राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ड्रग्जमुक्त समाज निर्माण करणे हा असून, सर्वांनी या मोहिमेत सहभागी होऊन देश

वर्ष :६, अंक क्रं. : ६२, फेब्रुवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

नशामुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विद्यार्थी जीवनात केवळ अभ्यासाचेच व्यसन असावे, असेही डॉ. पाटील यांनी प्रतिपादन केले. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे यांनी नशा व त्याचे मानवी जीवनावर होणारे परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थी दशेत कोणत्याही प्रकारचे व्यसन टाळावे, कारण त्यातून मिळणारे क्षणिक सुख आयुष्यावर गंभीर व विपरीत परिणाम करू शकते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारत या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन शपथ देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पराडे तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे हिंद की चादर श्री. गुरु तेग बहादुर साहिब यांचा ३५० वा समागम वर्ष उत्साहात साजरे





**दि. १७ फेब्रुवारी, २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे हिंद की चादर श्री. गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या समागम वर्षानिमित्त सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने दि. १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत श्री. गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे कार्य उपस्थितांपर्यंत पोहोचवले. दि. १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी त्यांच्या जीवनावर आधारित चित्रफितीचे प्रक्षेपण करण्यात आले. तसेच पंजाबी पार्श्वगायक श्री. सतिंदर सरताज यांनी सादर केलेल्या गीताचे श्रवण विद्यार्थ्यांना घडविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. हिंद की चादर ही पदवी त्यांना का प्रदान करण्यात आली, यामागील ऐतिहासिक पार्श्वभूमीही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, श्री. प्रशांत नागे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पराडे, श्री. भूषण जगताप तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच शारीरिक शिक्षण प्रशिक्षक डॉ. रियाज शेख, राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके आणि डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दि. १९ फेब्रुवारी, २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर शिवज्योतीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून फेटे बांधले होते. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची मान्यवरांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली. पुढे विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडे, गीत व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.





याप्रसंगी डॉ. गणेश देशमुख यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. शिवाजी महाराजांचे नाव शिवाई देवीवरून ठेवण्यात आले असून, भूभागाची सखोल माहिती, वेगवान हालचाली आणि गनिमी काव्याच्या तंत्राच्या साहाय्याने त्यांनी बलाढ्य मुघल व आदिलशाही सत्तेला यशस्वीपणे तोंड दिले असे त्यांनी सांगितले. तसेच राज्यकारभारात पारशी भाषेऐवजी मराठी व संस्कृत भाषेचा वापर प्रोत्साहित केल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यानंतर डॉ. सागर पाटील यांनी आपल्या मनोगतातून शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध पैलू उलगडले. ते एक कुशल प्रशासक होते तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेणारे राजे होते, हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.या कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. गणेश देशमुख, कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पराडे, डॉ. ऐश्वर्या पाटील तसेच श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. अशोक पाटील व श्री. संतोष गवई आदी उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वांनी शिवशपथ घेतली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी केकाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिरीष कांबळे यांनी केले.

## संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा कार्यक्रम संपन्न





**दि. २८ फेब्रुवारी, २०२६.** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई; जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव; तसेच तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ, मुक्ताईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव श्री. एम. क्यू. एस. एम. शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रांत अधिकारी, भुसावळ श्री. जितेंद्र पाटील, जिल्हा न्यायाधीश–१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भुसावळ

श्री. सुनील सुर, उपविभागीय पोलिस अधिकारी, मुक्ताईनगर श्री. अनिल बडगुजर, तसेच दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी–१, मुक्ताईनगर श्री. बाळासाहेब पवार यांनी महाविद्यालयाच्या स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांशी व प्राध्यापकांशी संवाद साधला.

या कार्यक्रमात संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उभारलेला स्टॉल विशेष आकर्षण ठरला. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी कृषि अनुभवाधारित शिक्षण कार्यक्रमांतर्गत तयार केलेल्या दुग्धजन्य पदार्थांबरोबरच फळे व भाजीपाला प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांची माहिती उपस्थित मान्यवरांनी जाणून घेतली व त्यांचे कौतुक केले. स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध कृषि–आधारित व मूल्यवर्धित उत्पादने आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली होती. सेंद्रिय उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ तसेच शेतीपूरक उपक्रमांशी संबंधित वस्तूंना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अनेकांनी उत्पादने खरेदी करून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी स्वतः ग्राहकांशी संवाद साधत उत्पादनांची माहिती दिली. त्यामुळे त्यांना विपणन व उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना व नाविन्यपूर्ण विचारांना चालना मिळाल्याचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमामुळे शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली तसेच कृषि विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्पादनांचे सादरीकरण करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.

## वर्णे येथे एक दिवसीय प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन





**दि.२७ फेब्रुवारी, २०२६** स्पाइसेस बोर्ड (मुंबई) आणि कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आले व हळद बाजारपेठ जोडणी आणि गुणवत्ता सुधारणा या विषयावर एक दिवस या प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन वर्णे, ता. सातारा येथील सरस आंत्रप्रनर्सच्या प्रकल्पावर करण्यात आले होते. यावेळी स्पाइसेस बोर्डाचे (मुंबई) उपसंचालक श्री. सीमांत सैकीया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्पाइसेस बोर्डाच्या सहाय्यक संचालिका डॉ. ममता धनकुटे, बोरगाव कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ श्री. भूषण यादगिरवार, प्रवीण मसाल्याच्या व्यवस्थापिका डॉ. पुष्पा आहेर, ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. मानसिंग पवार, सरस आंत्रप्रणर्सचे कार्यकारी संचालक श्री. श्रीकांत घोरपडे व डॉ. श्रीधर पवार उपस्थित होते.

यावेळी श्री. सीमांत सैकीया मार्गदर्शन करताना म्हणाले की जिल्ह्यात हळद व आले पिका खालील क्षेत्र मोठे आहे. या पिकांच्या प्रक्रियेत स्वच्छता, दर्जा, नियंत्रण, ट्रेसेबिलिटी आणि निर्यात मानकांचे काटेकोर पालन केल्यास शेतकरी व प्रक्रिया उद्योजकांना जागतिक बाजारपेठ काबीज करणे सहज शक्य आहे. यासाठी सरस आंत्रप्रणर्ससारख्या संस्थांनी पुढाकार घेऊन गुणवत्तापूर्ण उत्पादने तयार करण्यावर भर द्यावा. यावेळी डॉ. ममता धनकुटे यांनी मसाले प्रक्रियेमध्ये गुणवत्ता नियंत्रणाचे महत्त्व अधोरेखित केले तर श्री. भूषण यादगिरवार यांनी काढणीपश्चात व्यवस्थापन आणि प्रक्रिया तंत्रज्ञानाचे सविस्तर सादरीकरण केले. यावेळी श्री. श्रीकांत घोरपडे व डॉ. श्रीधर पवार यांनी केवळ

तांत्रिक माहिती न देता प्रशिक्षणादरम्यान सरस आंत्रप्रनर्स येथे आले आणि हळद मूल्यवर्धनाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. डॉ. पुष्पा आहेर यांनी प्रक्रियेसाठी कच्चामाल निवडताना कोणती काळजी घ्यावी आणि उद्योगाच्या स्तरावर मानके कशी टिकवावीत यावर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात शिबिरास जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकरी, प्रक्रिया उद्योजक आणि कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८४६/२०२६**